<u>नि. फौ. ख. क्र.५०/२०१८</u> निशाणी ३८

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.७ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – चंद्रकांत सिद्राम ममताबादे

वय – ४१ वर्षे, व्यवसाय – सहा. पोलीस निरीक्षक, पो.स्टे. सिताबर्डी, नागपूर शहर

पत्ता – मुकरमाबाद, ता. मुखेड, जि. नांदेड

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. के. एस. ताकवाले यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि.१०.११.२०१७ रोजी मी स्थानीक गुन्हे शाखा, अकोला येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी मी आरोपी नामे शे. फिरोज शे. चॉद याच्या विरुध्द बार्शीटाकळी पो.स्टे. येथे नोंद असलेल्या गुन्ह्याच्या तपासकामी गेलो होतो. सदर तपासादरम्यान मिळालेल्या माहितीवरुन आम्ही अब्दुल सादीक कुरेशी, रा. बार्शीटाकळी येथील त्याच्या घराची दोन पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याच्या घरामध्ये १०५ गोवंशाचे वेगवेगळ्या रंगाचे चामडे व ५ मिठाचे पोते मिळून आले, असा एकुण २,१२,५००/– चा मुद्देमाल मिळून आला. सदर मिळून आलेल्या मुद्देमालाबाबत मी चौकशी करुन माहिती घेतली असता सदर मुद्देमाल शे. फिरोज शे. चॉद याच्या मालकीचा असल्याचे समजले. सदर मुद्देमाल दोन पंचांसमक्ष जप्त करुन त्याचा पंचनामा तयार केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येत आहे.

२. सदर मुद्देमालाबाबत संपुर्ण जिल्ह्यामध्ये आम्ही वायरलेस मॅसेजद्वारे माहिती दिली. त्या माहितीवरुन पो.स्टे. उरळ येथे नोंद असलेला अप. क्र.७६/२०१७ मधील तपासीक अधिकारी श्री. श्रीकृष्ण डांगे यांनी आमच्याकडे जप्त असलेल्या मुद्देमालाची फिर्यादीसह शहानिशा केली, त्यामध्ये अ.क्र. २ व ९ कडील दोन चामडे हे फिर्यादी याच्या जनावरांचे असल्याचे त्यांनी ओळखले. आरोपीस मी पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात उपस्थित नाही, त्याच्या ओळखीविषयी त्यांच्या वकीलांमार्फत कोणताही वाद उपस्थीत नसल्याचे सांगितले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. फिरोज खान यांचे मार्फत उलटतपासः</u>**

३. सदर जप्त मुद्देमाल केल्यानंतर वायरलेस द्वारे संपुर्ण जिल्ह्यामध्ये मी माहिती केव्हा दिली, त्याची तारीख मला सांगता येणार नाही. सदर गुन्ह्यातील तपासिक अधिकारी श्री. डांगे यांच्यासोबत माझा संपर्क कधी झाला, हे मला सांगता येणार नाही. सदर जप्त मुद्देमालाचा रासायनिक परिक्षण न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा येथून मी करुन घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर जप्त केलेले चामडे हे कोणत्या जनावरांचे होते, हे मला रासायनिक परिक्षण न केल्यामुळे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल ज्याच्या ताब्यातून जप्त केला जातो त्यावर त्या इसमाची सही घेतली जाते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | सदर जप्ती पंचनाम्यावर ज्या इसमाच्या ताब्यातून मुद्देमाल मिळून आला त्याची सही तुम्ही पंचनाम्यावर घेतली नाही ? |
| **उत्तरः** | सदर मुद्देमाल हा घटनास्थळावरुन मिळून आला, घटनास्थळावर इसम हजर असता तर आम्ही त्याची सही घेतली असती. |

४. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या मालकीबाबत कोणतेही दस्त मी तपासिक अधिकारी यांना दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही जनावराचे कातडे हे २–३ महिन्यांनंतर त्यांची योग्य ती काळजी घेतली नाहीतर ते कुजतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर गुन्ह्याकामी तपासिक अधिकारी श्री. डांगे यांनी माझी चौकशी केली नाही व माझा जबाब नोंद केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाची पावती संबंधित तपासिक अधिकारी यांनी माझ्याकडे मागितली नाही, व मी त्यांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २३.१२.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.12.23 15:53:34 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २३/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २३/१२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २३/१२/२०२५ |